











# राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचा निर्मल स्कूलमध्ये समारोप

पाचोरा : पाचोरा येथील निर्मल इंटरनॅशल स्कूलमध्ये सुरु असलेल्या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचा शानदार समारोप झाला असून गेल्या तिन दिवसापासून सुरु असलेल्या स्पर्धेत निर्मल इंटरनॅशनल स्कूलच्या १९ वर्षाआतील मुलींच्या संघासह कोल्हापूर(१९ वर्ष मुले), शांतीनिकेतन शाळा, तसेच स्कॉटीश परभणी (१७ वर्ष मुली) आणि सेंट्रल काउंटी शाळा नागपूर (१७ वर्ष मुले) यांनी आपापल्या गटात अजिंक्य राहून राज्यस्तरीय मानाच्या स्पर्धेत सुवर्ण पदक जिंकले. गोवा आणि महाराष्ट्र राज्यातील क्लस्टर ९ विभागातील सीबीएससी पॅटर्नच्या शाळांचे १९ वर्ष आणि १७ वर्ष वयोगटातील मुले आणि मुली अशा २ वीागात ४ गटात हे सामने निर्मल इंटर नॅशनल स्कूलच्या प्रांगणात २२ सप्टेंबर पासून सुरु होते. मॅट प्रकारात झालेल्या या स्पर्धेत सीबीएससीच्या ५६ नोंदणिकृत शाळापैकी ४२ संघानी सहभाग घेतला होता. तीन दिवस घातलेल्या या स्पर्धेत विविध संघानी रोमहर्षक खेळाचे दर्शन घडविल्याने उपस्थितांनी प्रचंड दाद दिली. सीबीएससीचे स्पर्धा निरीक्षक डॉ. बाबासाहेब उकपे यांच्या निगराणीत हे सामने पार पडले. काल सायंकाळी ४ वाजता विजेत्या स्पर्धकांचा बक्षीस वितरण सोहळा शाळेच्या ग्राउंडवर पार पडला. यावेळी शाळेचे चेअरमन वैशाली सुर्यवंशी, शाळेचो सचिव नरेंद्रसिंह सुर्यवंशी, स्पर्धा निरीक्षक डॉ. बाबासाहेब उलपे, प्राचार्य भगवान सोमवंशी, प्रदिप सोनवणे आदी उपस्थित होते.

यात १७ वर्षा आतील मुलांच्या गटात प्रथम द. सेंट्रल स्कूल नागपूर, द्वितीय निर्मल इंटरनॅशनल स्कूल पाचोरा, तृतीय ऑल सेंटस् हायस्कुल ठाणे यांनी राज्यभरातून आलेल्या २२ संघांमध्ये आपल्या खेळाची चुणूक दाखवत यश मिळवले. १७ वर्षाच्या आतील मुलींच्या गटात प्रथम क्रमांक स्कॉटीज अकॅडमी स्कूल परभणी, द्वितीय ऑल सेंटस् हायस्कुल ठाणे, तृतीय सेंट व्यंकटेश स्कुल सरांगली यांनी यश मिळविले.

१९ वर्षांआतील मुलींच्या गटातील सामने हे साखळी पध्दतीने खेळवले गेल्याने यातील पाच संघांना गुणांनुसार विजयी घोषीत करण्यात आले. यात प्रथम निर्मल इंटरनॅशनल स्कूल पाचोरा, द्वितीय दत्तकला शिक्षण संस्था पुणे, तृतीय जिंदाल विद्यामंदिर वाशिम, चतुर्थ अरविंद इंडो, पब्लीक स्कूल नागपूर व पाचवे कॅब्रीज स्कूल नाशिक यांनी तर १९ वर्षाआतील मुलांच्या गटामध्ये प्रथम शांतीनिकेतन स्कूल कोल्हापूर, द्वितीय जिंदाल विद्या मंदिर वाशिम व तृतीय क्रमांक निर्मल इंटरनॅशनल स्कूल पाचोरा यांनी संघांनी मिळवला. या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी जळगाव जिल्हा क्रीडा असोसिएशनतर्फे पंचप्रमुख सुनील राणे, स्पर्धा निरिक्षक चेतराम पवार, अलेंक्झाडर मनी, नयनसागर मनी, बी. एन.पाटील, अरविंद महागडे, अनिल कोळी, कमलेश पाटील, हरीष शेळके, हितेश सोनी, अनिल सुरळकर, सुरेश महाजन, लोकेश बाविस्कर, प्रशांत सुरळकर, केतन भालेराव यांनी पंच म्हणून कामगिरी बजावली. राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेतील बेस्ट रायडर सोनाली दुधगावकर स्कॉटीस अकॅडमी परभणी हिची तर ऑलराऊंडर प्लेअर म्हणून गायत्री पटेल स्कॉटीश ॲकेडमी परभणी यांनी बहुमान मिळवला. क्षणाक्षणाला उत्कंठा वाढवणाऱ्या या राज्यस्तारीय कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्रभरातून आलेल्या संघाचे नियोजनबद्ध निर्मल इंटरनॅशनलतर्फे उत्तम ठेवण्यात आला. यासाठी गणेश राजपूत, सुशांत जाधव, संतोष पाटील, नंदकिशोर पाटील, आसीफ खान, प्रशांत पाटील, उमेश ढगे, स्नेहल पाटील, वर्षा देशमुख, सीमा पाटील, नर्मदा पांडे, अश्विनी कुलकर्णी, शीतल मोराणकर, अंजली आव्हाड यांनी अथक परिश्रम घेतले.

॥ ६ वे पुण्यस्मरण ॥



# चाळीसगाव एज्युकेशन सोसायटीच्या चेअरमनपदी नारायणदास अग्रवाल

चाळीसगाव : चाळीसगाव एज्युकेशन ... निवड करण्यात ...



## अशोक चुन्याचे बनावट उत्पादन तयार करणाऱ्यास अटक

अमळनेर : येथील आर.के.पटेल ...